# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,(दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. 832 -ए, फायनल प्लॉट क्रमांक 178 व 179 बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - 411 004.

Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


जा.क्र./मरापप/बापवि/2023/ 5009.
दिनांक: 28/08/2023

वाचा :-

१) महाराष्ट्र शासनाचे आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विभागीय परीक्षेचे आयोजन करणेबाबतचे दि. १३/०१/२०२१ रोजीचे पत्र क्र. ईएसटी - ३९२०/प्र.क्र.१५/प्रशा-२

२) शिक्षण आयुक्त कार्यालयाचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस विभागीय परीक्षा आयोजन करणेबाबतचे दि. ०४/०७/२०२३ रोजीचे पत्र क्र.आशिका/प.नियो./२३/आस्था-अ/१०५/४०५९

## अधिसूचना

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचेमार्फत उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व २ नुसार महाराष्ट्रात कार्यरत असलेले खालील पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर (विभागीय) परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

परीक्षेसाठी नामांकित पदे खालीलप्रमाणे -
खालील नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीत घेण्यात येईल.

| अ.क्र. | विभागीय परीक्षा | कालावधी |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) यासंवर्गातील प्राचार्य (गट -अ), जेष्ट अधिव्याख्याता (गट-अ), अधिव्याख्याता (गट-ब) | दि. ३०/०९/२०२३ ते दि. ०१/१०/२०२३ |
| २ | महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) यासंवर्गातील शिक्षणाधिकारी व तत्सम पदे (गट-अ), प्रशासन अधिकारी (गट-अ) उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे (गट-ब) | दि. ३०/०९/२०२३ ते दि. ०१/१०/२०२३ |
| ३ | सामान्य राज्य सेवा (प्रशासन शाखा) अधीक्षक व तत्सम पदे (गट-ब) | दि. ३०/०९/२०२३ ते दि. ०१/१०/२०२३ |

उपरोक्त पदांसाठी विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा या अधिसूचनेव्दारे अधिसूचित केली जात आहे. या परीक्षेचे वेळापत्रक सोबत सादर केलेले आहे.

**२. परीक्षा आवेदनपत्रे** : या परीक्षेसाठी पात्र परीक्षार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर लॉगिन करुन विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने दि. ०१/०९/२०२३ ते दि. ०५/०९/२०२३ या कालावधीत अर्ज भरावेत.



Scanned with CamScanner

ली नसल्याचे एकुण
/२०२३.
हेब, वरीष्ठ
थेची

कोणत्याही परिस्थितीत अर्ज भरणेसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपरोक्त अर्ज परिपूर्ण भरून सबमीट केलेनंतर वरिष्ट सनियंत्रण अधिकारी यांच्या लॉगिनला फॉरवर्ड करुन त्यांच्या शिफारशीसाठी पाठवावेत. उपरोक्त भरलेल्या परिपूर्ण अर्जाची प्रत संकेतस्थळावरुन डाऊनलोड करून ती प्रत मा. आयुक्त, (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे जमा करावी.

**३. परीक्षा शुल्क :-**

सदर परीक्षेकरिता शासन पत्र क्र.विभाप-३३२०/प.क्र.४५/प्रशा-२ दि.०७/०६/२०२१ रोजीच्या मान्य पत्रान्वये रुपये ८००/- (आठशे रुपये फक्त) परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने परिषदेकडे सादर करावेत. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क अदा करणेसाठी कृतीओघ तक्ता (FLOW CHART) सोबत सादर केलेला आहे.

**४. परीक्षेचे माध्यम :-** परीक्षा फक्त मराठी माध्यमातूनच घेणेत येईल.याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**५. परीक्षेसाठी अभ्यासक्रम :-**

परीक्षा खालीलप्रमाणे दोन भागात असेल.

१. सर्वसाधारण विषय.

२. विभागाचे विषय.

भाग १ व भाग २ साठीचा अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिकेचे गुण हे परिशिष्ट एक मध्ये नमूद केलेप्रमाणे असतील.

**परिशिष्ट - एक - अ (शिक्षण सक्षमीकरण शाखा)**

(नियम ६ पहा)

| | | |
|---|---|---|
| **भाग - ०१** | **सर्वसाधारण विषय** | **गुण** |
| (१) प्रश्नपत्रिका-एक-सर्वसाधारण अधिनियम व नियम (पुस्तकांसह) | | १०० |
| (२) प्रश्नपत्रिका-दोन-लेखे व वित्तीय कार्यपध्दती (पुस्तकांसह) | | १०० |
| **भाग - ०२** | **विभागाचे विषय** | **गुण** |
| (३) प्रश्नपत्रिका-तीन-अध्यापकीय व शालेय शिक्षणातील नवीन विचार प्रवाह | | १०० |
| (४) प्रश्नपत्रिका-चार-शिक्षण विभागाचे अधिनियम, नियम आणि विनियम | | १०० |
| | | **एकूण - ४००** |

**परिशिष्ट - एक - ब (प्रशासन शाखा)**

| | | |
|---|---|---|
| **भाग - ०१** | **सर्वसाधारण विषय** | **गुण** |
| १. शिक्षण खात्यातील प्रशासकीय शाखेसंबंधी प्रचलित शैक्षणिक प्रश्न (पुस्तकांशिवाय) | | १०० |
| २. रुल्स ॲन्ड रेग्युलेशन ऑफ एज्युकेशन डिपार्टमेंट , बॉम्बे एज्युकेशन मॅन्युएल वगैरेवर आधारित प्रश्न (पुस्तकांशिवाय) | | १०० |
| **भाग - ०२** | **विभागाचे विषय** | **गुण** |
| ३. सर्व्हिसेस रुल्स, बॉम्बे सिव्हिल सर्व्हिसेस कन्डक्ट, डिसिप्लीन आणि अपील रुल्स, वगैरे. (पुस्तकांसह) | | १०० |
| ४. अकाऊंन्ट्स व फायनान्शियल प्रोसिजर आणि फायनान्शियल रुल्सवर आधारित प्रश्न (पुस्तकांसह) | | १०० |
| | | **एकूण - ४००** |

**६. परीक्षेचे वेळापत्रक :-**

परीक्षा दि. ३०/०९/२०२३ ते दि. ०१/१०/२०२३ या कालावधीत सोबत दिलेल्या वेळापत्रकानुसार आयोजीत केलेली आहे.

**७. आवेदनपत्र :-** विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र www.mscepune.in या परिषदेच्या संकेतस्थळावर दि. ०१/०९/२०२३ ते ०५/०९/२०२३ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन दिली जाईल. ऑनलाईनद्वारे



Scanned with CamScanner

प्राप्त झालेले अर्ज दि.०१/०९/२०२३ ते ०६/०९/२०२३ या कालावधीत मा. शिक्षण आयुक्त व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० कार्यालयामार्फत ऑनलाईन Approval करुन घेतले जातील.

| महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) या संवर्गातील प्राचार्य (गट-अ), जेष्ठ अधिव्याख्याता (गट-अ) व अधिव्याख्याता (गट-ब) या पदासाठी विभागीय परीक्षा वेळापत्रक | | |
|---|---|---|
| **वार व दिनांक** | **वेळ** | **पेपर क्रमांक व विषय** |
| शनिवार ३०/०९/२०२३ | **सकाळी १०.०० ते दुपारी १.००** | पेपर क्र.:१- सर्वसाधारण अधिनियम व नियम (पुस्तकांसह) |
| | **दुपारी २. ०० ते सायं. ५.००** | पेपर क्र.:२- लेखे व वित्तीय कार्यपध्दती (पुस्तकांसह) |
| रविवार ०१/१०/२०२३ | **सकाळी १०.०० ते दुपारी १.००** | पेपर क्र.:३- अध्यापकीय व शालेय शिक्षणातील नवीन विचार प्रवाह (पुस्ताकांशिवाय) |
| | **दुपारी २. ०० ते सायं. ५.००** | पेपर क्र.:४- शिक्षण विभागाचे अधिनियम, नियम आणि विनियम (पुस्ताकांशिवाय) |

| महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) या संवर्गातील शिक्षणाधिकारी (गट-अ), प्रशासन अधिकारी (गट-अ), उपशिक्षणाधिकारी (गट-ब) व अधीक्षक (गट-ब) या पदासाठी विभागीय परीक्षा वेळापत्रक | | |
|---|---|---|
| **वार व दिनांक** | **वेळ** | **पेपर क्रमांक व विषय** |
| शनिवार ३०/०९/२०२३ | **सकाळी १०.०० ते दुपारी १.००** | पेपर क्र.:१- शिक्षण खात्यातील प्रशासकीय शाखेसंबंधी प्रचलित शैक्षणिक प्रश्न (पुस्तकांशिवाय) |
| | **दुपारी २. ०० ते सायं. ५.००** | पेपर क्र.:४- अकाऊंन्ट्स व फायनान्शियल प्रोसिजर आणि फायनान्शियल रुल्सवर आधारित प्रश्न (पुस्तकांसह) |
| रविवार ०१/१०/२०२३ | **सकाळी १०.०० ते दुपारी १.००** | पेपर क्र.:३- सर्व्हिसेस रुल्स, बॉम्बे सिव्हिल सर्व्हिसेस कन्डक्ट, डिसिप्लीन आणि अपील रुल्स, वगैरे. (पुस्तकांसह) |
| | **दुपारी २. ०० ते सायं. ५.००** | पेपर क्र.:२- रुल्स ॲन्ड रेग्युलेशन ऑफ एज्युकेशन डिपार्टमेंट , बॉम्बे एज्युकेशन मॅन्युएल वगैरेवर आधारित प्रश्न (पुस्तकांशिवाय) |

**८. परीक्षा केंद्र :-**

परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईनद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या आपल्या प्रवेशपत्रामध्ये परीक्षा केंद्र नमूद केले जाईल.

**९.** मा. शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे यांचेमार्फत ज्या परीक्षार्थ्यांचे अर्ज Approval होऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे प्राप्त होतील केवळ असेच परीक्षार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होतील, याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**१०.** सदर परीक्षेसाठी ऑनलाईनद्वारे अर्ज भरलेला असूनही मा.शिक्षण आयुक्त व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांचेमार्फत ऑनलाईन Approval होऊन सदरचा अर्ज परिषदेकडे प्राप्त झाला नाही तर अशा कोणत्याही परीक्षार्थ्यांचे परिषदेकडे प्राप्त झालेले परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**११. परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या अटी व शर्ती.**

१) सदर परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या परीक्षार्थ्यांकडे परिषदेने दिलेले विहीत नमुन्यातील प्रवेशपत्र सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह साक्षांकित करुन परीक्षेच्या वेळी स्वत: जवळ बाळगणे बंधनकारक राहील. तसेच स्वत:ची ओळख (Identification) पटवून देणेकरिता मूळ प्रवेशपत्रासह शासकीय ओळखपत्र (आधार कार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना/निवडणूक आयोगाचे ओळखपत्र यापैकी एक) असणे आवश्यक राहील.



Scanned with CamScanner

२) परीक्षेसाठी परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरू झालेनंतर अर्धा तासानंतर परीक्षार्थ्यास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

३) परीक्षा केंद्रावर अथवा इतर कोणत्याही परीक्षा हॉल (कक्ष) मध्ये कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य (मोबाईल, ब्लुटूथ, कॅलक्युलेटर, स्मार्ट वॉच इ.) स्वत: जवळ बाळगणेस सक्त मनाई आहे.

४) परीक्षेदरम्यान जे पेपर / विषय पुस्तकांशिवाय आहेत. अशा विषयाचे पेपर सुरू असताना परीक्षार्थ्यांकडे पुस्तके / कॉपी साहित्य आढळल्यास सदरची बाब गैरवर्तणूक समजून सदर परीक्षार्थ्यावर Provision of Mal Practices Act १९८२ अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

५ सदर परीक्षेतील पुस्तकांसह असलेल्या पेपरला शासनमान्य पुस्तकांचा वापर करणे बंधनकारक राहील. परिषदेमार्फत परीक्षार्थ्यांना कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

६) परीक्षेच्या वेळी उपस्थित परीक्षार्थ्यास प्रवासभत्ता व दैनिकभत्ता परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही. याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

* **परीक्षार्थ्यांना परीक्षा कक्षामधून बाहेर जाणेबाबत :-**

**अ.** परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाटप केलेपासून पाऊणतास संपेपर्यंत कोणत्याही परीक्षार्थ्याला परीक्षा कक्षाबाहेर जाता येणार नाही.

**ब.** परीक्षा चालू असताना एखाद्या परीक्षार्थ्याला प्रसाधन कक्षात जावयाचे असेल तर त्याने / तिने परीक्षा कक्षाबाहेर जाणेपूर्वी पर्यवेक्षकाची परवानगी घेणे आवश्यक राहील. तशी परवानगी घेतली नसल्यास त्यास / तिस परीक्षा कक्षामध्ये पून्हा प्रवेश दिला जाणार नाही.

**क.** एखाद्या परीक्षार्थ्यास परीक्षा सुरू झाल्यानंतर पाऊण तासानंतर परंतू परीक्षेची वेळ संपण्यापूर्वी परीक्षा कक्षाबाहेर जावयाचे असेल तर त्याने / तिने पर्यवेक्षकांकडे त्याची / तिची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका जमा करणे आवश्यक राहील. जे परीक्षार्थी पेपरच्या शेवटच्या वेळेपर्यंत परीक्षा कक्षात राहतील त्यांची / तिची उत्तरपत्रिका पर्यवेक्षक घेईपर्यंत आपल्या जागेवर बसून राहणे आवश्यक आहे.

उपरोक्त अ, ब व क च्या अधीन राहून कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थ्याने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकाच्या परवानगीशिवाय आपली जागा सोडू नये.

**१२.** सदर परीक्षेचा निकाल जाहीर झालेनंतर प्राप्त गुणांबाबत काही शंका असल्यास विहीत मुदतीत, विहीत नमुन्यात अर्ज सादर करुन व विहीत शुल्क अदा करुन उत्तरपत्रिकेतील गुणांची केवळ गुणपडताळणी करून घेता येईल. उत्तरपत्रिकेच्या गुणपडताळणी करणे करिता रूपये १००/- प्रती उत्तरपत्रिका एवढे शुल्क ऑनलाईन जमा करावे.

उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करणेसाठी विनंती अर्जही सादर करु नयेत. उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणार नाही. तसेच उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केले जाणार नाही.

**१३.** परीक्षार्थ्यांने उत्तरपत्रिकेमध्ये प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड) सलगरित्या सोडवावेत.

**१४.** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने विभागीय परीक्षा संदर्भात केलेल्या सूचनांचे परीक्षार्थ्यांने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सदर सूचनांचे पालन न केल्यास संबंधित परीक्षार्थ्यास परीक्षा कक्षा बाहेर काढणे, गुण वजा करणे, परीक्षार्थ्यांची चालू परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील परीक्षांना प्रतिबंध करणे इत्यादी शिक्षेस संबंधित परीक्षार्थी पात्र राहील. संबंधित परीक्षार्थ्यास शिक्षा देण्याचा अंतिम अधिकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचा राहील.

**१५.** परीक्षार्थ्यांनी कागदाची बचत म्हणून उत्तरपत्रिकेतील पृष्टांच्या दोन्ही बाजूस लिहीणे बंधनकारक राहील.

**१६.** उत्तरपत्रिकेवर ओळख पटेल असे कोणतेही आक्षेपार्ह लिखाण आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(अनुराधा ओक)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४



Scanned with CamScanner